# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **लोकसहभागातुनचं यशस्वी होवु शकते "डीप क्लिन ड्राईव्ह" मोहिम- मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री यांचे प्रतिपादन**
- **दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी मीरा भाईंदर मनपातर्फे आयोजित डीप क्लीन ड्राईव्ह या मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी मुख्यमंत्री मा एकनाथ शिंदे हे बोलत होते.**

हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्यमंत्री यांनी राज्यातील सर्वच शहराना आवाहन केले होते आणि मुंबई ,ठाणे महानगरपालिकेच्या स्वछता मोहिमेमध्ये मा मुख्यमंत्री स्वतः सहभागी झालेले आहेत. त्याच धर्तीवर ३० डिसेंबर रोजी मीरा भाईंदर या शहरात डीप क्लीन ड्राईव्ह सुरू करण्यात आले आहे. मनपा आयुक्त संजय श्रीपतराव काटकर यांनी मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतुन साकार झालेली ही मोहीम

दिनांक 30 डिसेंबर 2023 रोजी आयोजित नवघर हनुमान मंदिरा जवळील परिसरात मा. मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीमध्ये राबविली. मा. आमदार प्रताप सरनाईक आणि मा. आमदार गीता जैन यानी देखील या मोहिमेत सहभाग नोंदवला.

डीप क्लीन ड्राईव्ह या मोहिमेचा उद्देश रस्ते आणि पदपथावरील धूळ कमी करणे हा आहे. या मोहिमेदरम्यान अनेक नागरिक, राजकीय प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांनी या मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. महापालिका सफाई कामगारासोबत मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रस्त्यावर उतरून संवाद साधला.झाडू चांगल्या प्रतीचे वापरावे अशीही सूचना त्यांनी पालिका प्रशासनास केली.त्याच बरोबर कामगारांचे त्यांनी कौतुकही केले.

मा. मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार सुरू करण्यात आलेल्या सखोल स्वच्छता मोहिमेमध्ये शनिवारी प्रभाग क्रमांक 11 आणि 12 मध्ये वर्ग 1 आणि वर्ग 2 च्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली 22 पथके अथकपणे काम करताना दिसली. या नंतर दर शुक्रवारी 8 मार्च पर्यंत संपूर्ण शहरात ही मोहीम राबवली जाणार आहे.या विशेष मोहिमे मध्ये वॉर्डांमध्ये रस्ते, दुभाजक, फूटपाथ आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या ठिकाणी संपूर्ण स्वच्छता केली जाईल. बस स्टॉप वरील, भिंतींवरील पत्रिका आणि स्टिकर्स काढून टाकणे, तसेच शहरातील थुंकलेले रेड स्पॉट्स स्वछ करणे ही कामे केली जातील. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपक्रमाचे कौतुक करत मा. मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे यांनी हनुमान मंदिर, आणि गोल्डन नेस्ट रोड सारख्या ठिकाणी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. नागरिकांचा सहभाग आणि क्यूआर कोड मॉनिटरिंगद्वारे कचरा वर्गीकरणावर भर दिल्याबद्दल मा. मुख्यमंत्री यांनी आयुक्त यांचे कौतुक केले.

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त संजय श्रीपतराव काटकर यांनी मोहिमेदरम्यान मेरी गोल्ड सोसायटी येथे अभिनव कचरा वर्गीकरण प्रणालीचे सादरीकरण केले. या वेळी मा. मुख्यमंत्री यांनी नागरिकांशी संवाद साधला, उपक्रमातील त्यांची भूमिका समजून घेऊन स्वच्छतेच्या सामूहिक जबाबदारीचे महत्त्व सांगितले. मिरा भाईंदर महानगरपालिका पुढील काळात हा स्वच्छतेचा जागर कायम चालू ठेवेल. शहरातील रहिवाशांसाठी स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने मिरा भाईंदर महानगरपालिका नेहमीच कार्यरत राहणार असून नागरिकांनी सुद्धा सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच कार्यक्रमास प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सामाजिक संस्था व नागरिकांनी उपस्थिती दर्शविल्याबद्दल आयुक्त यांनी सर्वांचे आभार मानले व पुढील काळात ही संपुर्ण मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन केले.